## प्रेस नोट दिनांक ०८/०९/२०१९

## गॅस वितरण टेम्पो चालकाची नजर चुकवून सिलेंडर चोरणारे चोरटयास उत्तमनगर पोलीसांनी पकडले.

दिनांक १३/०९/२०१८ रोजी गणेश चतुर्थी (गणेश उत्सवाचा) बंदोबस्ता निमित्त तपास पथकाचे पोलिस उप निरीक्षक श्री के. के. कांबळे, तसेच सपोफौ. वायंदेडे पो हवा सुर्यवंशी पो ना पाटील, तनपुरे पो शि त्रिंबके, ढमढेरे, ताकवणे तसेच शिवणे मार्शल डयुटीचे कर्मचारी पो ना मिसाळ, पो शि राऊत असे उत्तमनगर पोलीस स्टेशन हद्दीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता पेट्रोलींग करीत होते.

त्यादरम्यान त्यांना नवभारत शाळा ते स्मशान भुमी शिवणे नांदेड सिटी रोडवर पेट्रोलींग करीत असताना १९/०० वा. चे सुमारास एक काळया रंगाची टीव्हीएस ज्युपीटर तिला आरटीओ नंबर नसलेली दिसली सदर दुचाकीवर एक इसम त्याचे दोन्ही पायाचेमध्ये एक सिलेंडर व त्याचे पाठीमागे बसलेल्या मुलीकडे एक असे दोन गॅस सिलेंडरसह दिसले. इकडील पोलीस स्टेशनचे हद्दीत गॅस सिलेंडर चोरीचे गुन्हयात मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज मधील आरोपीबाबत त्यांना संशय आल्याने त्यांनी त्यास थांबवून त्यास त्याचे नांव पत्ता विचारता त्याने त्याचे नांव संजय चंद्रकांत गिजरे वय- ४५ वर्षे रा- सर्वे नं. ३४ शिवशंकर चौक शिवशंकर बिल्डींग मोहननगर धनकवडी पुणे ४३ असे सांगितले. त्याचे पाठीमागे एक अल्पवयीन मुलगी वय- १६ वर्षे ही बसलेली होती. त्याचेकडे असलेल्या वाहनाचे कागदपत्रांचा तसेच त्यांचेजवळ असलेल्या दोन गॅस सिलेंडरबाबत चौकशी करता तो उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे देवू लागला त्यास पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्ह्याचे प्राप्त सीसीटीव्ही फुटेज दाखविले असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यास उत्तमनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ८२/२०१८ भादवि कलम ३७९,३४ मध्ये अटक करण्यात आली. त्याचेकडे केले तपासामध्ये तो गॅस सिलेंडर डिलीव्हरी बॉय हे गॅस सिलेंडर देण्यासाठी बिल्डींगमध्ये गेल्यानंतर त्याची नजर चुकवुन त्याने पार्क केलेल्या टेम्पोतून गॅस सिलेंडर चोरुन नेत होता. त्याने शिवणे, न्यु अहीरेगाव सिंहगड कॉलनी, शिवपार्वती बिल्डींग, काकडे टेरेस सोसायटी,पॉप्युलर कॉलनी, अतुलनगर, गोकूळनगर, पॉप्युलरनगर / गिरीधरनगर रेणुकानगर निरंजन प्रेस्टीज सोसायटी, वारजे नाका येथील तिरुपतीनगर सोसायटी वारजे पुणे तसेच सर्वत्र सोसायटी, अंनत कृपा सोसायटी पौड रोड कोथरुड पुणे तसेच लालगोलीसा सोसायटी, सैनिकवाडी, वडगांव शेरी पुणे इत्यादी ठिकाणाहून गॅस सिलेंडर चोरी केल्याचे कबुल करुन त्याने भारत पेट्रोलीयम, हिंदूस्थान पेट्रोलियम व इंडेन गॅस कपंनीचे असे एकूण- २७ गॅस सिलेंडर काढून दिले. सदर आरोपीकडून उत्तमनगर पोलीस स्टेशन ०१ गुन्हा, वारजे पोलीस स्टेशन ०२ गुन्हे, कोथरुड पोलीस स्टेशन ०१ गुन्हा, व येरवडा पोलीस स्टेशन ०१ गुन्हा असे एकूण- ०५ गुन्हे उघडकीस आले असून सदर आरोपीकडून ज्युपीटर दुचाकी व २७ गॅस सिलेंडर असा सर्व मिळून ७७,३३०/- रुपये किंमतीचा माल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. रविंद्र सेनगांवकर अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा. श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ३ पुणे शहर, मा.श्री. बाजीराव मोहिते, सहा. पोलीस आयुक्त कोथरुड विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली उत्तमनगर पो.स्टे पुणे चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती अनघा देशपांडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सतिश डहाळे, तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक के.के.कांबळे, स.पो.फौ. वायदंडे, पो.हवा.सुर्यवंशी,पो.ना. मिसाळ, तनपुरे, पाटील पो शि राऊत , ढमढेरे, ताकवणे, त्रिंबके यांनी पार पाडली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे